क्रमांक : जमीन- २६०२/९५८/प्र.क्र. १०८३/ज-३
**महसूल व वन विभाग,**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ५ मे, २००६.

विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
मौजे घाटकोपर येथील स.नं. २३६/अ, नभूक्र. १९४/अ
मधील जमीन विविध खेळाचे क्रीडांगण व इतर मनोरंजन
प्रयोजनाकरिता मिळणेबाबत.....
रसिका रंजनी सभा या संस्थेची मागणी.

**ज्ञापन :-**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना वरील विषयासंबंधीच्या त्यांच्या क्रमांक-सी/ कार्या-२५/ कावि/१९९/२००२, दि. १०/७/२००२ च्या पत्रास अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, रसिका रंजनी सभा या संस्थेस विविध खेळाच्या क्रीडांगण व इतर मनोरंजन सार्वजनिक लोकोपयोगी प्रयोजनाकरीता मौजे घाटकोपर येथील स.नं. २६६/अ, न.भू.क्र. १९४/अ या जमिनीच्या मंजूर अभिन्यासामधील मनोरंजन मैदान यासाठी आरक्षीत असलेली १५०९.३७५ चौ.मी. जमीन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ७ मधील तरतुदीनुसार आणि शासन परिपत्रक क्रमांक - एलआरएफ १०८३ /१४९६ /प्र.क्र. ३७०० / ग-६, दि.११.५.१९८४ मधील तरतुदीनुसार त्या जमिनीची तात्पुरती किंमत प्र.चौ.मी. रु. ३००/- इतकी मानून या दराप्रमाणे सुमारे १५०९.३७५ चौ.मी. जमिनीच्या होणा-या एकुण रकमेच्या १०% रक्कमेवर भारतीय स्टेट बँकेच्या प्रत्येक वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या प्राईम लेंडींग रेट प्रमाणे होणा-या व्याजाच्या रकमेइतके प्रतिवर्षी भाडे आकारुन आणि शासन परिपत्रकक्रमांक- एलआरएफ १०८३ / ७११३४ /प्र.क्र. ३४७८/ग-६, दि. ८.२.१९८७ मधील परिच्छेद ११ मधील अटी / शर्तीवर व नगर विकास विभागाने नमूद केलेल्या खालील अटींवर १५ वर्षांच्या भाडेपट्टयाने मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

अट :- १) विकास नियंत्रण नियमावलीनुसार सदर जागेतील १० टक्के क्षेत्रात १५ टक्के बांधकाम क्षेत्र हे पॅव्हेलियन, क्लब हाउस अशा स्पोर्टस व रिक्रिएशन ॲक्टिव्हिटीसाठी अनुज्ञेय आहे व उर्वरीत जागा मोकळी ठेवणे आवश्यक आहे.

२) प्रश्नाधीन क्षेत्र क्रीडा विकासासाठी राखीव असल्यामुळे या क्षेत्रावर क्रीडा अनुरुप बांधकाम अपेक्षित आहे. सदर बांधकाम करण्यापूर्वी जिल्हा क्रीडा संकुल समितीची पूर्व परवानगी घेण्यात यावी.

३) या बांधकामाचा अथवा भूभागाचा क्रिडेत्तर प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही, असे केल्यास याबाबतची परवानगी रद्द करण्यात येईल.

४) यामधून मिळणा-या उत्पन्नाचा वापर क्रीडा प्रयोजनासाठीच करण्यात येईल.

५) संस्थेने पुढील १५ वर्षांचा क्रीडा विकासाचा आराखडा तयार करावा व दरवर्षी क्रीडा विकासाचा अहवाल उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा, मुंबई यांना सादर करण्यात येऊन दर ५ वर्षांनी मिड टर्म रिव्ह्यूच्या अधिन राहून ५ वर्षांपुढील मुदतवाढ देण्यात यावी.

६) संस्थेच्या मुख्य कार्यकारिणीमध्ये जिल्हाधिकारी हे पदसिध्द अध्यक्ष असतील.

७) संस्थेच्या मुख्य कार्यकारिणीमध्ये उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई यांना नॉन व्होटींग राईटसह पदसिध्द सभासद म्हणून सामावून घेण्यात यावे.

८) संस्थेतील सभासदांच्या सभासदत्वाची फी जिल्हाधिकारी निश्चित करतील. शासकीय जमिनीचा उपयोग करुन संस्थेस स्वतःसाठी मोठा नफा मिळविणे शक्य होणार नाही यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्तावाची छाननी करुन सदस्य शुल्क व इतर शुल्क ठरवावे. ते संस्थेस मान्य व बंधनकारक असेल.



WS-533

९) संस्थेत सरकारी कर्मचाऱ्यांना (Public Servant) सभासदत्व देणे संस्थेस बंधनकारक असेल. एकूण सदस्यांपैकी सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या १/४ पेक्षा कमी असू नये.

१०) विषयांकित मोकळ्या जमिनीचा वापर आम जनतेसाठी दररोज दिवसा ठराविक कालावधीसाठी करण्यासाठी विनामुल्य परवानगी देणे संस्थेस बंधनकारक असेल.

११) संस्थेचा क्रीडा विकास आराखडा तयार करण्याकरिता कार्यकारिणीमध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी व शिक्षण अधिकारी यांचा समावेश करण्यात यावा.

१२) क्रिडा विभागाकडून राज्य शासनाच्या " Catch them young " योजना तयार करण्यात येत असून या योजनेसंदर्भात ज्या अटी / शर्ती ठरविण्यात येतील त्या संस्थेवर बंधनकारक राहतील.

१३) मंजूर जमिनीची दि.१/२/१९७६ रोजीची किंमत सहाय्यक संचालक नगर रचना व मूल्य निर्धारण विभाग यांजकडून निर्धारीत करुन घेण्यात यावी. अंतीम किंमत तात्पुरत्या किंमतीपेक्षा अधिक भरल्यास फरकाच्या रक्कमेवरील भाडेपट्टयाची रक्कम वसूल करण्यात यावी.

२. हे शासन नगर विकास विभाग, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्यक विभाग यांच्या सहमतीने आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८९४/०४/व्यय-९, दि.१/१२/२००४ च्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वै. भू. लटके )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

प्रतिलिपी :-

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण विभाग, मुंबई.
३) महालेखापाल १/२ ,महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर. (लेखा परीक्षा)
४) महालेखापाल १/२ ,महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर(लेखा व अनुज्ञेयता)
५) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण, मुंबई.
६) नगर विकास विभाग ,मंत्रालय ,मुंबई-३२.
७) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) वित्त विभाग, (व्यय -९) मंत्रालय, मुंबई - ३२
१०) निवडनस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

Ph.26556799, 26557807 Fax : 26556805 email address:- collrmsd@yahoo.com


(162)

क्र. :-सी/कार्या-३डी/एल-६३७
दिनांक :- /७/२००६ 12 JUL 2006

**वाचले :-** १) शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. जमिन २६०२/९५८/प्र.क्र १०८३/ज-३ दिनांक ५ मे २००६.

**आदेश:**

रसिका रजनी सभा या संस्थेस विविध खेळाच्या क्रिडांगण व इतर मनोरंजन सार्वजनिक लोकोपयोगी प्रयोजन करिता मौजे घाटकोपर येथील स.नं. २३६/अ न.भू.क्र. १९४/अ या जमिनीच्या मंजूर अभिन्यासातील मनोरंजन मैदान यासाठी आरक्षित असलेली १५०९.३७५ चौ. मी. जमिन महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ७ मधील तरतुदीनुसार आणि शासन परिपत्रक क्रमांक एलआरएफ १०८३/१४९६/प्र.क्र. ३७००/ग-६ दि. ११/५/१९८४ मधील तरतुदीनुसार त्या जमिनीची तात्पुरती किंमत प्र. चौ. मी. रु. ३००/- इतकी मानून या दराप्रमाणे सुमारे १५०९.३७५ चौ. मी. जमिनीच्या होणाऱ्या एकूण रकमेच्या १०% रकमेवर भारतीय स्टेट बँकेच्या प्रत्येक वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या प्राईम लेन्डीग रेट प्रमाणे होणाऱ्या व्याजाच्या रकमे इतके प्रतिवर्षी भाडे आकारुन आणि शासन परिपत्रक क्रमांक एलआरएफ १०८३/७११२४/प्र.क्र. ३४७८/ग-६ दि. ८/२/१९८३ मधील परिच्छेद ११ मधील अटी / शर्तीवर व नगर विकास विभागाने नमुद केलेल्या खालील अटीवर १५ वर्षाच्या भाडेपट्टयाने मंजूर करण्यास शासनाची मान्यता दिली आहे. सबब उद्देशिकेतील अ. क्र. १ वर नमुद असलेल्या शासनाचे दि. ५ मे २००६ रोजीचे ज्ञापनाचे अधीन राहून या कार्यालयाची मान्यता खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

**अटी :-**

१) विकास नियंत्रण नियमावलीनुसार सदर जागेवरील १० टक्के क्षेत्रात १५ टक्के बांधकाम क्षेत्र हे पॅव्हेलियन क्लब हाऊस अशा स्पोर्टस व रिक्रीएशन ॲक्टीव्हीटीसाठी अनुज्ञेय आहे. व उर्वरित जागा मोकळी ठेवणे आवश्यक आहे.

२) प्रश्नाधीन क्षेत्र क्रिडा विकासासाठी राखीव असल्यामुळे या क्षेत्रावर क्रिडा अनुरुप बांधकाम अपेक्षित आहे. सदर बांधकाम करणेपूर्वी जिल्हा क्रिडा संकुल समितीची पुर्व परवानगी घेण्यात यावी.

३) या बांधकामाचा अथवा भूभागाचा क्रिडेतर प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही. असे केल्यास याबाबतची परवानगी रद्द करण्यात येईल.

४) यामधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वापर क्रिडा प्रयोजनासाठीच करण्यात येईल.

५) संस्थेने पुढील १५ वर्षाचा , क्रिडा विकासाचा आराखडा तयार करावा व दरवर्षी क्रिडा विकासाचा अहवाल उपसंचालक क्रिडा व युवक सेवा मुंबई यांना सादर करण्यात येऊन दर ५ वर्षांनी मिडटर्म रिव्हूच्या अधीन राहून ५ वर्षापुढील मुदत वाढ देण्यात येईल.

६) संस्थेच्या मुख्य कार्यकारिणीमध्ये जिल्हाधिकारी हे पदसिध्द अध्यक्ष असतील.

७) संस्थेच्या मुख्य कार्यकारीणीमध्ये उपसंचालक क्रीडा व युवक सेवा मुंबई यांना नॉन व्होटींग राईटसह पदसिध्द सभासद म्हणून सामाऊन घ्यावे.

८) संस्थेतील सभासदांच्या सभासदत्वाची फी या कार्यालयाकडून निश्चित करणेत येईल. शासकीय जमिनीचा उपयोग करुन संस्थेस स्वतःसाठी मोठा नफा मिळविणे शक्य होणार नाही. यासाठी प्रस्तावाची छाननी करुन सदस्य शुल्क व इतर शुल्क ठरविणेत येईल ते संस्थेस मान्य राहील.

९) संस्थेत सरकारी कर्मचाऱ्यांना (public servant) सभासदत्व देणे संस्थेस बंधनकारक असेल.एकुण सदस्यापैकी सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या १/४ पेक्षा कमी असु नये.

१०) विषयांकीत मोकळया जमिनीचा वापर आम जनतेसाठी दररोज दिवसा ठराविक कालावधीसाठी करण्यासाठी विनामुल्य परवानगी देणे संस्थेस बंधनकारक असेल.

११) संस्थेचा क्रिडा विकास आराखडा तयार करणेकरीता कार्यकारीणीमध्ये जिल्हा क्रिडा अधिकारी व शिक्षण अधिकारी यांचा समावेश करण्यात यावा.

१२) क्रिडा विभागाकडून राज्य शासनाच्या ' Catch them Young' योजना तयार करण्यात येत असून या योजनेसंदर्भात ज्या अटी/शर्ती ठरविण्यात येतील त्या संस्थेवर बंधनकारक राहतील.

१३) भाडेपट्टेदार यांनी प्रश्नांकित जमिनीची तात्पुरती किंमत रु. ३००/- प्रती चौ. मी. या दराप्रमाणे १ जानेवारी २००६ च्या प्राईम लेन्डीग रेट प्रमाणे तात्पुरता प्रती वर्षी भाडेपट्टयाची रक्कम रु. ४६४१/- सदर आदेशाच्या दिनांकापासून ७ दिवसात जमा करावी.

१४) मंजूर जमिनीची दि. १/२/१९७६ रोजीची किंमत सहाय्यक संचालक नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग यांजकडून निर्धारण करुन घेण्यात येत आहे. अंतिम किंमत तात्पुरत्या किंमतीपेक्षा अधिक भरण्यास फरकाच्या रकमेवरील भाडेपट्टयाची रक्कम वसूल करण्यात येईल.

१५) बांधकाम अनुज्ञेय क्षेत्रात बांधकाम २ वर्षात पूर्ण करुन मंजूर प्रयोजनार्थ जागेचा वापर आदेशाच्या दिनांकापासून ३ वर्षात सुरु करावा.

१६) मोकळी जागा लग्न समारंभ व इतर कोणत्याही कार्य प्रसंगाकरिता इतर कोणास देता येणार नाही.

१७) वरील अटी व शर्ती व्यतिरिक्त इतर अतिरिक्त अटींचा समावेश करणेचा शासन / जिल्हाधिकारी त्यांचा हक्क कायम राहिल.

COLLECTOR जिल्हाधिकारी MUMBAI SUBURBAN मुंबई उपनगर

१८) सदर शासकीय जागेची विक्री / हस्तांतरण अथवा पोटभाडयाने इतर कोणास शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय देता येणार नाही.

१९) वरिल अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र रक्कम रु. २२०/- चे स्टॅम्प पेपरवर या कार्यालयास सादर करावे.

२०) वरिल अटी शर्तींपैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास कोणताही मोबदला न देता जागा शासन जमा करणेत येईल.

आपला विश्वासू,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

प्रति,

अध्यक्ष
रसिका रजनी सभा २/२२,
सावित्री कुंज, गारोडीया नगर,
घाटकोपर (पूर्व) मुंबई-४०० ०७७

प्रत :- १) मा. प्रधान सचिव (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांजकडे शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमिन २६०२/९५८/प्र.क्र. १०८३/ज-३ दि. ५ मे २००६ अन्वये माहिती करीता सविनय सादर.

२) मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग कोकण भवन नवी मुंबई ४००६१५ यांजकडे माहिती करीता सविनय सादर.

३) तहसिलदार कुर्ला / नगर भूमापन अधिकारी घाटकोपर यांजकडे माहीती व पुढील कार्यवाही करीता रवाना २/- भाडेपट्टेदार यांनी भाडेपट्टयाची रक्कम भरली आहे. किंवा नाही याची खात्री करुन जागेचा ताबा देवून गावच्या अभिलेखात योग्य ती नोंद घेवून ७/१२ मिळकत पत्रिकेच्या अद्यावत प्रती या कार्यालयास सादर कराव्यात.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी
यांची सही आहे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

Saroja S.
FOR
Rasika Ranjani sabha

D-order-mrs